# महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे  शारीरिक शिक्षण महाविद्यालय

# वार्षिक अहवाल 2014-15

महाराष्ट्रीय मंडळाचे आद्य संस्थापक कै. कॅ. शिवरामपंत दामले व त्यानंतर मंडळाचे अध्वर्यू माजी सरकार्यवाह कै. रमेश दामले यांच्या पवित्र स्मृतिस अभिवादन करून महाविद्यालयाचा शै. वर्ष 2014-15 चा वार्षिक अहवाल सहर्ष सादर करीत आहे. या महाविद्यालयात शारीरिक शिक्षणातील पुणे विद्यापीठाचे बी.एड्., एम. एड्., एम.फिल. व पीएच. डी. पर्यंतचे अभ्यासक्रम राबविले जातात महाविद्यालय एन.सी.टी.ई. मान्यताप्राप्त असून नॅक पुनर्मूल्यांकित आहे.

## ठळक वैशिष्ट्ये

1) इंटरनॅशनल मॅरेथॉन सिंपोझियमचे आयोजन
2) २९ व्या पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग
3) Trends, Issues & Future of Physical Education विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन
4) यू.जी.सी रिफ्रेशर कोर्सचे महाविद्यालयात आयोजन
5) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळाचे अध्यक्षपदी डॉ शिंदे
6) सालाबादप्रमाणे बी.एड्.(शा.शि.) व एम.एड्.(शा.शि.)  निकालामध्ये  नेत्रदीपक यश
7) क्रीडापटूंचे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्त्व व योगदान व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये प्रतिनिधीत्त्व
8) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्पोर्टसतर्फे अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावर सर्वाधिक क्रीडासहभागासाठी महाविद्यालयास प्रथम पारितोषिक  (विभागून)
9) बी.एड्.(शा.शि.) २०१३–१४ च्या २ विद्यार्थ्यांना थायलंड येथे योगशिक्षक म्हणून प्लेसमेंट
10) एकूण 06 विद्यार्थ्यांना पीएच.डी. (१५–४–२०१५ पर्यंत)
11) राष्ट्रीय व राज्य पातळीवर विद्यार्थ्यांना कॅंपस रिक्रूटमेंट
12) आगाशे प्राईड पारितोषिक – श्रीमती शोभा निकम यांना जाहीर

- **प्रवेश २०१४–१५**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | प्रवेशित विद्यार्थीसंख्या |
|---|---|---|
| १ | बी.एड (शा.शि) | १४५ |
| २ | एम.एड (शा.शि)(प्रथमवर्ष) | ४१ |
| ३ | एम.एड (शा.शि) (द्वितीयवर्ष) | ४४ |
| ४ | एम.फिल (शा.शि) (सुटीतील अभ्यासक्रम) (शै.वर्ष २०१३–१५) | १२ |
| ५ | एम.फिल (शा.शि) (सुटीतील अभ्यासक्रम) (शै.वर्ष २०१४–१६) | १२ |
| ६ | पीएच.डी.(जुलै २०१४) | १९विद्यार्थ्यांची निवड |

- **गतवर्षीय परीक्षा फल**

➢ **सालाबादप्रमाणे निकालामध्ये नेत्रदीपक यश**

| अभ्यासक्रम | निकाल |
|---|---|
| बी.एड्. (शा.शि.) | 96.77%, |
| एम.एड्.(शा.शि) | 100%, |

| अभ्यासक्रम | 2014-15 मधील उत्तीर्ण | 2014-15 पर्यंत उत्तीर्ण |
|---|---|---|
| एम.फिल (शा.शि.) | 04 | 83 |
| पीअेच.डी. | 06 | 25 |

➢ **महाविद्यालयात व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सर्वप्रथम**

बी.एड्.(शा.शि.) – श्रीमती श्रद्धा सावंत

एम.एड्. (शा.शि.)– श्री आदित्य कुलकर्णी

अनेक विद्यार्थी सेट / नेट परीक्षा उत्तीर्ण होतात.

- **विद्यार्थ्यांचा ओघ**

दरवर्षी महाविद्यालयात विविध राज्यातील तसेच परदेशातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेश घेतात व यशस्वी होतात. या वर्षी इराक व येमेन मधील ०३ विद्यार्थी एम. एड्. (शा.शि.) (द्वितीय वर्ष) अभ्यासक्रम पूर्ण करीत आहत. वेस्ट बेंगाल व गोवा या राज्यातील विद्यार्थ्यांनी सर्वाधिक प्रवेश

घेउन( बी.एड शा.शि.–२६ व एम.एड शा.शि.०७) या महाविद्यालयास पसंती दर्शविली आहे. बी.एड शा.शि अभ्यासक्रमास एकूण तीन तुकड्या असून ३० विद्यार्थ्यांची एक तुकडी विनाअनुदानित आहे.

## १. क्रीडावैशिष्ट्ये

1) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्पोर्टसतर्फे अखिल भारतीय विद्यापीठ स्तरावर सर्वाधिक क्रीडासहभागासाठी महाविद्यालयास प्रथम पारितोषिक (विभागून)
2) आंतरविद्यापीठ व राष्ट्रीय स्तरावर जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग व नेत्रदीपक यश
3) सलग 17 व्या वर्षी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये पदके प्राप्त.विद्यार्थ्यांना विविध खुल्या स्पर्धांमध्ये रोख पारितोषिके
4) $Endro_3$ Adventure Race मध्ये विद्यार्थ्यांचे नेत्रदीपक यश, रू.95,000/- ची रोख पारितोषिके
5) क्रीडाप्राविण्याबद्दल विद्यार्थ्यांना पुढील प्रमाणे गौरविण्यात आले.

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ क्रीडा विभागातर्फे अश्वमेध स्पर्धा सहभागाबद्दल खालील विद्यार्थीखेळाडूंना पुरस्कार जाहीर**

| अ.क्र | विद्यार्थ्यांचे नांव | पुरस्काराची रक्कम |
|---|---|---|
| 1 | कु भरणकर पूनम बी.एड्.(शा.शि.) | रू.1,000/- |
| 2 | कु. पाटणकर मानसी बी.एड्.(शा.शि.) | रू.1,000/- |
| 3 | कु. गायकवाड स्वाती बी.एड्. (शा.शि.) – | रू.1,000/- |
| 4 | कु. पंडित ममता बी.एड्. (शा.शि.) | रू.1,000/- |
| 5 | कु. खानापुरे उत्तरा बी.एड्. (शा.शि.) | रू.5,000/- |
| 6 | श्री करपे जीवन बी.एड्. (शा.शि.) | रू.5,000/- |
| 7 | श्री थेटे ज्ञानेश्वर बी.एड्. (शा.शि.) | रू.3,000/- |
| 8 | श्री सोनवणे अनिल बी.एड्. (शा.शि.) | रू.3,000/- |
| 9 | श्री पवार अनिकेत बी.एड्. (शा.शि.) | रू.2,000/- |
| 10 | श्री चव्हाण रोहन एम.एड्. (शा.शि.) | रू.1,000/- |

## 6) विशेष कामगिरी

1) बीना खडकुंबर्गे– एम.एड. (शा.शि.) द्वितीय वर्ष या विद्यार्थिनी ने नॅशनल गेम्स २०१४ मधील हॅन्डबॉल स्पर्धेत सहभाग तृतीय क्रमांक रुपये २ लाखांचे रोख पारीतोषिक पटकाविले.
2) कोमल वाघुले– एम.एड. (शा.शि.) द्वितीय वर्ष या विद्यार्थिनी ने नॅशनल गेम्स २०१४ मधील बीच हॅन्डबॉल स्पर्धेत सहभाग .तृतीय क्रमांक रुपये २ लाखांचे रोख पारीतोषिक पटकाविले.

3) क्लेंन्सिओ पिंटो –बी.एड. (शा.शि.) Buenos,Airs, Arjentina येथे झालेल्या फुटबॉल टीमचे प्रतिनिधीत्व (जुलै/ऑगस्ट २०१४)

4) श्री. स्वप्निल गलांडे – ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी – बेसबॉल (मुली) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासाठी मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्य

### 7) पंच कार्य

| अ.क्र. | नाव | तपशील |
|---|---|---|
| 1 | तेजश्री कांबळे | कयाकिंग व कनोईन (स्टेट –२०१४ नांदेड )<br>नॅशनल गेम्स – २०१५ (केरळ) |
| 2 | कोंडाजी घोडके | कराटे ( नॅशनल – २०१५ पुणे) |
| 3 | क्षिप्रा पैठणकर | योग (सूर्यनमस्कार) (डिस्ट्रीक्ट – २०१५ पुणे) |
| 4 | तेजस बेन्द्रे | स्कूल ऑलिंपिक्स (सकाळ) पुणे<br>जिम्नॅस्टिक्स –२०१५ |
| 5 | राजेंद्र गिलबिले | योग (सूर्यनमस्कार) (डिस्ट्रीक्ट – २०१५ पुणे) |
| 6 | प्रदीप बोत्रे | कुराश (इन्टरस्कूल) कोल्हापुर २०१५ स्टेट |
| 7 | सूरज रावत | फुटबॉल, ॲलेटिक्स, मॅरेथॉम (स्टेट २०१५) |
| 8 | मुकेश रावत | फुटबॉल, ॲलेटिक्स, मॅरेथॉम (स्टेट २०१५) |
| 9 | जितेंद्र पाटील | पुणे महापौर चषक राज्यस्तरीय खोखो स्पर्धा<br>मॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठ खोखो संघ व्यवस्थापक |
| 10 | अक्रम मुजावर | लांब उडी आणि जंपिंग इव्हेन्टस शालेय स्तरावरील राज्य स्तरीय मैदानी स्पर्धा |

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांखेरीज आमचे खेळाडू विद्यार्थी अनेक राष्ट्रीय/ राज्यस्तरीय /जिल्हास्तरीय खुल्या क्रीडास्पर्धांमध्ये सहभागी होऊन रोख पारितोषिके मिळवितात व स्वकष्टार्जित कमाई करून शिक्षणाचे शुल्क भरतात.

### 8) क्रीडासहभाग

महाविद्यालयामध्ये दरवर्षीच विविध क्रीडाबाबींमध्ये आंतरमहाविद्यालयीन, विभागीय व राष्ट्रीय पातळीवर खेळलेले खेळाडूंचा सहभाग असतो. यावर्षी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्पोर्टसतर्फे सर्वाधिक क्रीडासहभागासाठी महाविद्यालयास प्रथम पारितोषिक प्रदान करण्यांत आले.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धासामन्यांमध्ये एकूण १३ सांघिक क्रीडाबाबी व ९ वैयक्तिक क्रीडास्पर्धामध्ये आमच्या खेळाडूंचा सहभाग होता.

## आंतरमहाविद्यालयीन आंतरविभागीय व राष्ट्रीय पातळी वरील सहभाग

| स्तर | मुले | | मुली | | एकूण | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बी.एड्. | एम.एड् | बी.एड्. | एम.एड् | बी.एड्. | एम.एड् | |
| आंतरमहाविद्यालयीन | 61 | 30 | 30 | 13 | 91 | 43 | 134 |
| विभागीय पातळी | 19 | 10 | 15 | 10 | 34 | 20 | 54 |
| आंतरविद्यापीठ व<br>अखिल भारतीय आंतर विद्यापीठ | 07 | 05 | 08 | 04 | 15 | 09 | 24 |

## आंतर महाविद्यालयीन वैयक्तिक सहभाग – ९ क्रीडाबाबी

| अ.क्र. | क्रीडाप्रकार | मुले | मुली |
|---|---|---|---|
| १ | आर्चरी | I$^{st}$ Place | I$^{st}$ Place |
| २ | फेन्सिंग | II$^{nd}$ Place | - |
| ३ | पॉवर लिफ्टिंग | III$^{rd}$ Place | - |
| ४ | कुस्ती | I$^{st}$ | - |
| ५ | वेट लिफ्टिंग | II$^{nd}$ | - |
| ६ | सायकलिंग | Participation | Participation |
| ७ | मल्लखांब | I$^{st}$ | I$^{st}$ |
| ८ | स्विमिंग | - | II$^{nd}$ |
| ९ | कयाकिंग | - | Participation |

## महाविद्यालयाचे सांघिक बाबीं मधील यश– १३ क्रीडाबाबी

प्रथम क्रमांक – ०५ ,  द्वितीय क्रमांक – ०२ ,  तृतीय क्रमांक – ०४

| अ.क्र. | क्रीडाबाबीचे नांव | आंतरमहाविद्यालयीन स्तर | |
|---|---|---|---|
| | | मुले | मुली |
| 1 | ॲथलेटिक्स | प्रथम क्रमांक | प्रथम क्रमांक |
| 2 | बेसबॉल | तृतीय क्रमांक | प्रथम क्रमांक |
| 3 | बास्केटबॉल | Participation | प्रथम क्रमांक |
| 4 | क्रॉस कंट्री | प्रथम क्रमांक | प्रथम क्रमांक |
| 5 | फुटबॉल | द्वितीय क्रमांक | – |
| 6 | हॅन्डबॉल | द्वितीय क्रमांक | – |

| | | | |
|---|---|---|---|
| 7 | हॉकी | तृतीय क्रमांक | – |
| 8 | कबड्डी | तृतीय क्रमांक | – |
| 9 | खो खो | तृतीय क्रमांक | प्रथम क्रमांक |
| 10 | नेटबॉल | Participation | Participation |
| 11 | शूटिंग | Participation | Participation |
| 12 | सॉफ्टबॉल | Participation | Participation |
| 13 | व्हॉलीबॉल | Participation | – |

**खुल्या क्रीडा स्पर्धा सामन्यांमध्ये आमच्या खेळाडूंचा सहभाग पुढीलप्रमाणे**

| अ.क्र | नांव | क्रीडाबाब | आयोजक | निकाल | दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | क्षिप्रा पैठणकर | प्रो कबड्डी | महा. कबड्डी संघ | नाशिक जिल्ह्याकडून निवड | २४/१२/२०१४ |
| 2 | अक्षता भदाणे | कराटे | शिवछत्रपती क्रीडानगरी बालेवाडी | कांस्य पदक | २८ ते ३०/१०/२०१४ |
| 3 | उत्तरा ख़ानापुरे | रोप मल्लख़ांब | मराठा विद्या प्रसारक समाज | उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार रु.११,०००/– | ४/१/२०१५ |
| 4 | क्लेंन्सिओ पिंटो | फूटबॉल (Team-BOCA Jrs) | Buenos,Airs, Arjentina (International ) | | जुलै/ऑगस्ट २०१४ |
| 5 | सेरा डेनिझ | हॅन्डबॉल<br>ॲडव्हेनचर गेम | महापौर चषक<br>एन्ड्यूरो ३ | चतुर्थ क्र.<br>प्रथम क्र. | फेब्रुवारी ७–८ २०१५ |
| 6 | कोंडाजी घोडके | कराटे | १.बुडो फेडरेशन ऑफ इंडिया,पुणे | प्रथम क्र.(नॅशनल)<br>प्रथम क्र.(जिल्हा) | २७,२८ व २९/१२/२०१४<br>२८/९/२०१४ |
| 7 | थेटे ज्ञानेश्वर | Sr. stste Archery Champion Jalna 2015 | Org. by dalna Archery Association AIIU कुरुक्षेत्र हरीयाणा | (Team Bronze Medal) | |
| 8 | अनिल सोनावणे | Sr. stste Archery Champion Jalna 2015 | Org. by dalna Archery Association AIIU कुरुक्षेत्र हरीयाणा | (Team Bronze Medal) | |
| 9 | कड प्रतिक | बॉलबॅडमिंटण | जालना<br>सी.ओ.इ.पी.<br>कर्मवीर चषक | द्वितीय क्र.<br>प्रथम क्र.<br>द्वितीय क्र. | २०१४–१५<br>२६ जानेवारी १५<br>२२ फेब्रुवारी १५ |
| 10 | तेजस बेंद्रे | जिम्नास्टिक्स | मुंबई | सिल्व्हर मेडल | २०१४–१५ |
| 11 | अक्रम मुजावर | लांब उडी | खुल्या | सहभाग | |
| 12 | श्वेता पोरे | सॉफ्ट बॉल (सिनि.स्टेट्) | | तृतीय क्र. | २८ ते २९/१२/२०१४ |

**९. खुल्या स्पर्धांमधील विशेष यश : एनड्युरो नाईट एडव्हेचर रेस**

स्पर्धेचे अंतर –160 कि.मी., 90 कि.मी. ट्रेकिंग , 100 मी. स्विमिंग, रायफल शूटिंग 40 मी

**स्पर्धेतील विजेते खेळाडू**

प्रथम क्रमांक (रोख पारितोषिक रू. 25,000/- व स्मृतिचिन्ह)

- पुरुषोत्तम ढवळे (एम. एड्.(शा.शि.) (द्विितीयवर्ष)
- सेरा डेनिझ (बी. एड्.(शा.शि.)
- नितिन चौधरी (एम. एड्.(शा.शि.) (द्विितीयवर्ष)

**मिश्र खुला गट (250 कि.मी.)**

प्रथम क्रमांक (रोख पारितोषिक रू. 50,000/-व स्मृतिचिन्ह)

- कैलास कासार – बी.एड.(शा.शि.)
- **कॉर्पोरेट गट (रोख पारितोषिक रू. 15,000/-व स्मृतिचिन्ह)**

- राहुल पातुरकर (एम. एड्.(शा.शि.) (द्विितीयवर्ष)
- प्रियंका औटी एम. एड्.(शा.शि.) (प्रथमवर्ष)

**कॉर्पोरेट गट (रोख पारितोषिक रू.5,000/-व स्मृतिचिन्ह)**

- राठोड कविता एम. एड्.(शा.शि.) (प्रथमवर्ष)
- राम कदम (एम. एड्.(शा.शि.) (द्विितीयवर्ष)

**१०. आयोजन**

महाविद्यालय, स्पर्धा सहभागाबरोबरच विविध पातळींवरील स्पर्धांचे आयोजन करते. ह्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष स्पर्धा आयोजनाचाही अनुभव मिळतो.

- **Sports and Fitness Carnival**

चंद्रशेखर आगाशे कॉलेज व भारती विद्यापीठ व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण पदव्युत्तर विभाग यांच्या संघांमध्ये विशेष स्पर्धांचे आयोजन करण्यांत आले. यामध्ये पोस्टर प्रेझेंटेशन,प्रश्नमंजूषा सदर, फुटबॉल, रस्सीखेच,अडथळा शर्यत, हॅन्डबॉल, क्रिकेट या स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या. यामध्ये सर्वसाधारण विजेतेपद महाविद्यालयाने पटकाविले . (28 व 29 मार्च 2015). शै. वर्ष २०११–१३ च्या विद्यार्थ्यातर्फे दरवर्षी ह्या कार्निव्हलमधील प्रत्येक बाबीसाठी क्रीडाचषक पुरस्कृत करण्यात

येतात.त्याचप्रमाणे कै. शैलेश जगताप यांचे स्मरणार्थ उदयोन्मुख खेळाडूस शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. डॉ. आहेर व डॉ. बोडके यांनी या स्पर्धांचे संयोजन केले.

- **जागतिक सूर्यनमस्कार दिन** (10/01/2015) आदित्ययागा निमित्त पदवी, पदव्युत्तर विभाग विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचा–यांनी सामूहिक 10000 सूर्यनमस्कार घातले.

- **शारीरिक शिक्षण मापन व मूल्यमापन साहित्य प्रदर्शन**

एक आगळा वेगळा उपक्रम म्हणजे यावर्षी एम. एड्.(शा.शि.)प्रथमवर्षाच्या विद्यार्थ्यांनी शारीरिक शिक्षण मापन व मूल्यमापन साहित्याचे प्रदर्शनाचे आयोजन केले. बी.एड्.(शा.शि.) च्या विद्यार्थ्यांसह मैदानावर, जिम व योगाक्लासेसना येणा–या व्यायामप्रेमी या सर्वांना विविध कसोट्यांची माहिती सांगण्यांत आली व मापनही करण्यात आले.

- **प्रजासत्ताक दिनाचे,** संस्थेच्या ०४ शाळा व वाणिज्य महाविद्यालयासह एकत्रितपणे भव्य स्वरूपात आयोजन करण्यांत आले.

आमच्या विद्यार्थ्यांचे एरोबिक्स बॉलडान्स प्रात्यक्षिक पोलिस परेड ग्राउंडवर दाखविण्यात आले.

- **आंतरकुल स्पर्धा –**

हा बी.एड्. (शा.शि.) अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणा–या भावी शिक्षकांसाठी अतिशय उपयुक्त कार्यक्रम. यामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धाचे आयोजन व व्यवस्थापन प्रशिक्षण देण्यांत येते. दर शनिवारी आयोजित होणा–या आंतरकुल स्पर्धांमध्ये यंदा एकूण १४ क्रीडाबाबींच्या स्पर्धा आयोजित करण्यांत आल्या. या वर्षावधीतील विविध स्पर्धांमध्ये व ॲथलेटिक मीटमध्ये सर्वाधिक गुण मिळवून विद्यार्थ्यांमध्ये अशोक कुल व सुभाष कुल हे संयुक्त विजेते ठरले, तर विद्यार्थिनींमध्ये मैदानीस्पर्धांमध्ये प्रेरणाकुल विजेते ठरले.

- **विद्यार्थी उपक्रम**
  - **कमवा शिका योजना**

दरवर्षी महाविद्यालयात कमवा शिका योजना राबविण्यांत येते. पुणे विद्यापीठ व महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या योजनेचा लाभ बी.एड्.(शा.शि.) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी २८ विद्यार्थ्यांनी घेतला.यामध्ये विद्यार्थ्यांनी परिसर स्वच्छता व सुशोभिकरण, मैदान देखभाल, शारीरिक सुदृढता मापन, शालेय पाठांचे नियोजनात सहभाग, डेटा एन्ट्रीज नोंदवणे अशी कामे केली. एकंदरीत रक्कम रु.73960/-चे विद्यार्थ्यांना वाटप करण्यांत आले. यामध्ये रु.70946/-चे अनुदान विद्यापीठाकडून प्राप्त झाले. रु. ३०१४/– इतकी रक्कम महाविद्यालयाने खर्च केली आहे.

➢ **शैक्षणिक वर्ष २०१४–१५ साठी बी.एड्.(शा.शि.),एम. एड्.(शा.शि.) पदवीचे नियुक्त विद्यार्थी मंडळ**

| Sr. No. | Designation | Name |
|---|---|---|
| 1 | Offg. Principal | Dr. M. T. Waghchoure |
| 2 | Lecturer nominated by Principal | Dr. U. L. Raje |
| 3 | National Service Scheme Prog. Officer | Dr. A. F. Shinde |
| 4 | Director of Sports & Phy.Edn. | Mr. S.V. More |
| 5 | Highest Academic Merit preceding year for B.Ed.(Phy.Edu) | Mr. Gapat Suraj |
| 6 | Highest Academic Merit preceding year for M.Ed.(Phy.Edu) I$^{st}$ Year | Mr. Kale Arjun (M.Ed.Ist Yr) |
| 7 | Highest Academic Merit preceding year for M.Ed.(Phy.Edu) II$^{nd}$ Year | Ms. Shirole Jalaja(M.Ed.IInd Yr) |
| 8 | Nominated by Principal<br>Outstanding Sport Performance (U.R.) | Mr. Khan Vasim (M.Ed.IInd Yr) |
| 9 | Student member - N.S.S. Scheme | Ms. Pandit Mamata |
| 10 | Student member - N.C.C. Scheme | Mr. Ingawale Rohit |
| 11 | Student member - Cultural Activity | Mr. Gawandi Nasir |
| 12 | Lady student representative | Ms. Waghule Komal (M.Ed.IInd Yr) |
| 13 | Lady student representative | Ms. Kewat Kamini B.Ed.(Phy.) |

- **सांस्कृतिक कार्यक्रम**

वर्षभरातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांबरोबरच प्रेरणादिन,देशभक्तिपर गीते, राष्ट्रीय सण इत्यादिं कार्यक्रमांचा समावेश होता. विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित करण्यात आली.

1) प्रा भा.स. गोडबोले –ध्वजसन्मान ४/१/२०१५

2) डॉ. आमृळे (procedure of equipment purchase, maintenance & stock checking (27/1/15)

3) डॉ.पी.जी.धनवे – Organization of Sports Competions (28-1-2015)

4) डॉ. शेंडकर - Role & Responsibilities of D.P.E.(30-1-15)

5) प्रा.अष्टेकर – सूर्यनमस्कार – व्याख्यान व पंचपरीक्षा (45 students Appeared)

6) दि.२० फेब्रुवारी २०१५ रोजी श्री अरुण घोडके, सांगली यांची शिवचरित्र या विषयावर व्याखान आयोजित करण्यांत आले. यामध्ये विद्यार्थ्यांना शालेय पाठ कसा रंगवावा याचे साभिनय मार्गदर्शन करण्यांत आले.

## ➢ शिबिर व सहली

प्राध्यापकवृंदांच्या मार्गदर्शनाखाली स्नेहसेवा, खानापूर येथे विद्यार्थ्यांचे १० ते १३ डिसेंबर २०१४ या कालावधीत तीन दिवसीय निवासी शिबिर झाले. यामध्ये नियोजित स्पर्धा कार्यक्रमांचा विद्यार्थ्यांनी अनुभव घेतला.विद्यार्थ्यांना सिंहगड येथे सहलीसाठी नेण्यात आले.

दि.६ ते ०७ जाने.२०१५ या कालावधीत जे.ई.सी.आर.सी विद्यापीठ जयपुर राजस्थान येथे आयोजित इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फिजिकल एज्युकेशन ॲन्ड स्पोर्टस मध्ये डॉ.योगेश बोडके व प्रा शिरीष मोरे व एम.एड.(शा.शि.) अभ्यासक्रमाचे ३२ विद्यार्थी सहभागी झाले.

## ➢ विशेष प्रयोग

प्रत्येक विषयाच्या विविध घटकांवरील युनिट टेस्ट व क्लास टेस्ट्द्वारे विद्यार्थ्यांचे आकारीक मूल्यमापन करण्यांत आले. विविध खेळ व क्रीडाबाबींचे साहित्य, तात्विक बाबी व नियम यांचे आकलनासाठी विशेष प्रदर्शनाचे आयोजन करण्यांत आले.

## ➢ शैक्षणिक प्रयोग

विद्यार्थ्याचे ज्ञान, कौशल्य आणि ॲटिट्यूड व ॲप्टिट्यूड हा पाया मानून शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यांत येते जेणेकरून बी.एड्.(शारीरिक शिक्षण) अभ्यासक्रम पूर्ण करून बाहेर पडल्यानंतर विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल. विविध अध्यापन पध्दतींचा वापर करून विद्यार्थ्यांना तात्विक तसेच प्रात्यक्षिक कार्य आत्मसात करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते.

दरवर्षी प्रमाणे सॉफ्टस्किल संदर्भात मार्गदर्शन व मूल्यमापन केले.

## ➢ कँपस प्लेसमेंट

विद्यार्थ्यांना नोक–या मिळण्याच्या दृष्टीने महाविद्यालयात कँपस इंटरव्हयू आयोजित केले जातात. बी.एड्.(शा.शि.) २०१३–१४ च्या १) शिवतारे सुनील व झा कमलेश या दोन विद्यार्थ्यांना थायलंड येथे योगशिक्षक म्हणून पल्लवी कव्हाणे यांच्य प्रयत्नाने नोकरी मिळाली आहे.

तसेच विविध नामांकित शाळा, फिटनेस जिम, क्रीडामार्गदर्शक, शारीरिक शिक्षण संचालक आमच्या बी.एड्. (शा. शि.) व एम. एड्.(शा.शि.) च्या विद्यार्थ्यांना नोक–या मिळतात. यंदा School Sports program, Akanksha Foundation, Leapstart, IiSA,Edify Education सारख्या १५ मान्यवर शाळा व कंपन्याद्वारे कँपस इंटरव्हयू आयोजित करण्यात आले. १९० विद्यार्थ्यानी प्रत्येकी दोन ते तीन इंटरव्हयू दिले.त्यापैकी मुंबई, सांगली, सातारा कोल्हापूर, पुणे, नाशिक, चिपळूण व रोहा अशा विविध ठिकाणांसाठी ४० ते ४५ विद्यार्थ्यांना नोकरीचे ऑफरिंग लेटर मिळाले आहे.वेतन विस्तार रु.७००० ते ४०,०००/– असा आहे. विविध शाळा, जिम्नॅशियम मध्येही आमच्या विद्यार्थीशिक्षकांना मागणी आहे.

## • प्राध्यापकांची विशेष कामगिरी

मा.प्राचार्या डॉ.निमकर राष्ट्रीय पातळीवरील 12 व्या पंचवार्षिक योजनेच्या Mid Term Review Committee वर तसेच steering committee member आहेत.नॅक व एन. सी.टी.ई. च्या सल्लागार मंडळाच्या सदस्य आहेत. तसेच त्या महाराष्ट्र राज्य जिम्नॅस्टिक्स असोसिएशनच्या उपाध्यक्ष आहेत. त्या आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेच्या (APCESS) सदस्य आहेत.महाराष्ट्र राज्याच्या क्रीडाधोरण–2012 नुसार शालेय स्तरावर शारीरिक शिक्षणाच्या शिक्षणतज्ज्ञ सदस्यपदी निवड.स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अॅडहॉक बोर्ड ऑफ स्कूल एज्युकेशनच्या सदस्य. International Journal of Physical Education, Health and Sports Sciences च्या त्या Editorial Board member आहेत. Asian Council of Exercise & Sports Science (ACESS) च्या सदस्य, बोर्ड ऑफ स्पोर्टस सदस्य – एस.एस.सी.बोर्ड , स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रिसर्च रेकगनिशन कमिटी सदस्य

- ➢ डॉ. कांगणे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व भारती विद्यापीठाच्या आर. आर. कमिटीचे आणि गोवा विद्यापीठ – शारीरिक शिक्षण अभ्यासमंडळाचे सदस्य.
- ➢ डॉ. अरुण शिंदे – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ शारीरिक शिक्षण तदर्थ अभ्यासमंडळाच्या अध्यक्ष आहेत.

- डॉ. पोटे व डॉ. आहेर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एज्युकेशन विभागाने आयोजित केलेल्या Faculty Development Program मध्ये सहभागी झाले. (दि.२४ ते २९/११/२०१४) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत आगाशे महाविद्यालय आयोजित उदबोधन वर्गामध्ये रिसोर्स पर्सन म्हणून सहभाग घेतला.

➢ डॉ. श्रद्धा नाईक – शासनाच्या विविध समित्यांवर कार्यरत

- डॉ. महेश देशपांडे – एस.सी.इ.आर.टी. – अभ्यासक्रम पुनररचना अभ्यासमंडळावर सदस्य.महाराष्ट्र राज्य शैक्षणिक पाठ्यपुस्तक मंडळ, बालभारती येथे इ. ५ ते ८ वीच्या अभ्यासक्रमांची मानके विकसित करण्यांत मुख्य सहभाग. त्याचप्रमाणे इ.१ ली ते ३ री च्या आरोग्य व शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिकांमधील प्रत्येकी ५ प्रकरणांचे लिखाण करण्यात सहभाग. त्याचप्रमाणे इ.६ वी च्या आरोग्य व शारीरिक शिक्षण हस्तपुस्तिकेमध्ये ३ प्रकरणांचे लेखन केले. श्री शाहू मंदिर महाविद्यालय, पुणे व रामकृष्ण मोरे महविद्यालय निगडी येथे सेट परीक्षेच्या प्रथम पेपरवर व्याख्याने दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ विद्याप्रबोधिनी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत आगाशे महाविद्यालय आयोजित उदबोधन वर्गामध्ये रिसोर्स पर्सन म्हणून सहभाग घेतला.

➢ बी.एड्.(शा.शि.) अभ्यासक्रम पुनर्रचना समिती सदस्य – डॉ. अरुण शिंदे, (अध्यक्ष) डॉ. श्रध्दा नाईक डॉ. सोपान कांगणे, डॉ.बालाजी पोटे, डॉ. शरद आहेर, डॉ.महेश देशपांडे, डॉ. अमित प्रभू

➢ डॉ. उज्वला राजे यांनी दि.२८ फेब्रुवारी २०१५ रोजी स्वर्णिम स्पोर्टस युनिव्हर्सिटी गुजराथ येथे एनसीटीई आयोजित बी.एड (शा.शि.) दोन वर्षीय अभ्यासक्रमाचा आराखडा तयार करणेबाबतच्या ओरिएंटेशन प्रोग्रॅममध्ये सहभाग घेतला.

- प्राध्यापक ओरिएंटेशन प्रोग्राम व रिफ्रेशर कोर्स इ. मध्ये रिसोर्स पर्सन म्हणून सहभाग घेतात. (सोबत प्रपत्र)

आमचे प्राध्यापक नेहमीच नित्य कार्याव्यतिरिक्त संशोधन अभ्यास करुन क्रीडाक्षेत्रात भर घालत असतात. प्राचार्य व प्राध्यापक विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रे परिषदा आदिमध्ये संशोधन निबंध, बीजभाषणे याद्वारा सहभाग घेतात. समाजात व्यायाम व तंदुरुस्ती विषयक व्याख्याने देउन समाज प्रबोधन करतात.

आज मितीस महाविद्यालयात प्रभारी प्राचार्यांसह दहा प्राध्यापक पीएच.डी.प्राप्त आहेत.महाविद्यालयात ११ पीअेच.डी. मार्गदर्शक आहेत. एम.फिल मार्गदर्शक म्हणून ११ प्राध्यापकांना मान्यता प्राप्त आहे.

या वर्षावधीत जे.ई.सी.आर.सी विद्यापीठ जयपुर राजस्थान येथे आयोजित इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन फिजिकल एज्युकेशन अ‍ॅन्ड स्पोर्टस मध्ये डॉ.योगेश बोडके व प्रा शिरीष मोरे यांनी खालील विषयावर शोध निबंध सादर केला "Use of Mobile Health& fitness Apps for fitness: A modern Trend".

- **आयोजनः–**

## अ) इंटरनॅशनल मॅरेथॉन सिंपोझियम

पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन ट्रस्ट व आगाशे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने इंटरनॅशनल मॅरेथॉन सिंपोझियमचे दि. ५ डिसेंबर २०१४ रोजी यशस्वी आयोजन करण्यात आले. यामध्ये मॅरेथॉनचा इतिहास, मॅरेथॉन खेळाडूंचे प्रशिक्षण, आहार व दुखापती या विषयांवर विविध तज्ज्ञांची व्याख्याने झाली. त्यामध्ये अनेक राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय विदेशी खेळाडू, पंच व मॅरेथॉन संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते , शारीरिक शिक्षण संचालक, तज्ज्ञ मार्गदर्शक सहभागी झाले होते. महाविद्यालयाच्या माजी प्राचार्या डॉ.नयना निमकर या सिंपोझियमच्या Organizing secretary होत्या व डॉ.महेश देशपांडे समन्वयक होते. या सिंपोझियमच्या आयोजनात सर्व प्राध्यापकवृंदाचा सहभाग होते.

दि. ७ डिसेंबर २०१४ रोजी पुण्यात संपन्न झालेल्या २९ व्या पुणे इंटरनॅशनल मॅरेथॉन स्पर्धेमध्ये आपल्या विद्यार्थ्यांचा स्वयंसेवक म्हणून सहभाग होता.

## ब) राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजनः–

महाविद्यालयाने दि. २७ व २८ फेब्रुवारी २०१५ या कालात ट्रेन्डस, इश्युज अ‍ॅन्ड फ्युचर ऑफ फिजिकल एज्युकेशन अ‍ॅन्ड स्पोर्टस या विषयावर नॅशनल कॉन्फरन्स आयोजित केली. या मध्ये देशभरातील २३५ शारीरिक शिक्षण संचालक प्राध्यापक व विद्यार्थी सहभागी झाले होते. कर्नल पी. एस. चीमा, आर्मी स्पोर्टस इन्स्टिट्यूट पुणे यांचे हस्ते या चर्चा सत्राचे उदघाटन झाले. कर्नल चीमा यांनी आपल्या बीज भाषणा मध्ये उच्च दर्जाचे शारीरिक शिक्षण, उत्तम क्रीडापटूंची निर्मीती करु शकते असे प्रतिपादन केले.

या चर्चासत्रात ६५ शोध निबंधाचे वाचन झाले. तसेच भारतातील व परदेशातील शारीरिक शिक्षण व क्रीडा या वर प्रकाश झोत टाकला. या चर्चा सत्रा मध्ये थिअरी व प्रॅक्टिकल यांचा सामावेश होता. पॅनल चर्चे मध्ये श्री कीशन वहाबी (डायरेक्टर ऑफ फिट किड्स बंगळुरु) माजी प्राचार्या डॉ. नयना निमकर डॉ. लक्ष्मी कोटापटी, डॉ. टि.के. बेरा, श्री आनंद यादव, श्री केनेडी डिसील्वा, श्री मृदंग, डॉ. सुह्रद खरे, देवश्री मराठे, मनोज देवळेकर, डॉ. अतुल गायकवाड, डॉ. राजीव चौधरी या तज्ज्ञानी श्रोत्यांचे शंका समाधान केले. अशी चर्चा सत्रे नेहमी घेतली जावीत अशी अपेक्षा सहभागीनी व्यक्त केली. डॉ. महेश देशपांडे या चर्चा सत्राचे समन्वयक होते तर डॉ.माधुरी वाघचौरे या चर्चा सत्राच्या संचालिका होत्या.

### क) शारीरिक शिक्षणातील उदबोधन वर्गाचे आयोजन:-

दि. २ ते २२ मार्च २०१५ या कालावधीत महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्याप्रबोधिनी तर्फे यू.जी.सी. रिफ्रेशर कोर्स इन फिजिकल एज्युकेशन आयोजित करण्यात आला. या मध्ये देशभरातील ३५ प्राध्यापक व शारीरिक संचालक सहभागी झाले. या वर्गास अनेक मान्यवर तज्ज्ञानी व्याख्याने दिली. वर्गास अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला. डॉ. सोपान कांगणे या उदबोधन वर्गाचे समन्वयक होते.

### ➢ ओरिएंटेशन व रिफ्रेशर कोर्सेस

डॉ. योगेश बोडके, डॉ. अमित प्रभू, प्रा शिरीष मोरे यांनी महाविद्यालया मध्ये आयोजित शारीरिक शिक्षणातील **रिफ्रेशर कोर्स** पूर्ण केला.

### ➢ मार्गदर्शकांकडील विद्यार्थ्यांची पीएच.डी पूर्ण (२०१४-१५).

डॉ. निमकर -१, डॉ.वाघचौरे -२, डॉ. कांगणे - २, डॉ. एम. एन. देशपांडे -१ (एकूण - ६)

### • परीक्षा आयोजन व केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प

यावर्षी देखील सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने एम.एड्. (शा.शि.) ची परीक्षा. बी. एड् (शा.शि.) व एम. एड्. (शा.शि.) अभ्यासक्रमाच्या केंद्रीय मूल्यमापन प्रकल्प महाविद्यालयाकडे सोपविण्यांत आला. केंद्रीय मूल्यमापन प्रकल्पाचे कार्य डायरेक्टर डॉ. माधुरी वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले.

## ➢ बी.पी.एड्. अभ्यासक्रम पुनररचना

एन.सी.टी.ई.च्या आदेशानुसार बी. एड् (शा.शि.) (बी.पी.एड्.) अभ्यासक्रम शै. वर्ष २०१५–१६ पासून दोन वर्षांचा करण्यात येणार आहे. सदर अभ्यासक्रम आम्ही तयार केला असून विद्यापीठाकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आला आहे.

- ## गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा कडून अनुदान मंजूर

**अ) क्रीडा साहित्य**

वरील योजने अंतर्गत महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा कडुन क्रीडा साहित्यासाठी १ लाख अनुदान मंजूर झाले आहे. यामध्ये एअर कॉम्प्रेसर, हॅन्ड बॉल गोल पोस्ट, ॲलेटिक्स व फिटनेस साहित्याची खरेदी करण्यांत आली.

**ब) शैक्षणिक उपकरणे**

वरील योजने अंतर्गत महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा कडुन शैक्षणिक उपकरणांसाठी १ लाख अनुदान मंजूर झाले आहे. त्यातून लॅब इक्विमेंट– एलसीडी प्रोजेक्टर व एलइडी टिव्ही साहित्याची खरेदी करण्यांत आली.

या व्यतिरिक्त महाविद्यालयामध्ये या वर्षावधीत नवीन लॅपटॉप व एलसीडी प्रोजेक्टर खरेदी करण्यात आले.

## ➢ तंत्रज्ञानाधिष्ठित अध्यापन, संशोधन व व्यवस्थापन

काळानुरूप आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून अध्यापन व संशोधन करण्यासाठी Smart Board खरेदी केला असून त्याचा अधिकाधिक वापर करण्याची योजना आहे.

सध्याच्या काळात ई–बुक्स, ई जर्नल्सचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असून ग्रंथालयात टॅब्जचा उपयोग अतिशय प्रभावीपणे होत आहे.

Human performance Lab मध्येही बायसिकल एरगोमीटर, लॅक्टेट ॲनलायझर अशा अत्याधुनिक Sofisticated साधनांद्वारे शास्त्रीय संशोधने हाती घेण्याची योजना आहे.

सर्व सुविधांनी युक्त संगणक कक्षामध्ये SPSS 21.0 हे संख्याशास्त्राचे Software असून एम.एड्. (शा.शि.) ते पीएच.डी.पर्यंत विद्यार्थ्यांना वापरासाठी प्रशिक्षित केले जाते. प्रशासकीय कार्य सुकर

होण्यासाठी त्यात हजेरीच्या नोंदी चोख होण्यासाठी त्याच Attendance software विकसित करून त्याचा ट्राय आऊट घेऊन या सॉफ्टवेअरचा परिपूर्ण वापर सुरू आहे.

- **ग्रंथालय**

या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयामध्ये रू.35,048/- ची ग्रंथखरेदी करण्यात आली.ग्रंथालयात विद्यार्थ्यांसाठी 07 संगणक व वाय फाय सुविधा उपलब्ध आहे. या वर्षाअखेर ग्रंथालयामध्ये एकूण पुस्तके 17800, टायटल्स 13408, सीडीज 82 व व्ही.सी.डी 100 इ. उपलब्ध आहेत.

- **पारितोषिके**

महाराष्ट्रीय मंडळातर्फे खालील प्राध्यापक व विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

डॉ. बालाजी पोटे - उत्कृष्ट शिक्षक,

श्री श्रद्धा सावंत –बी.एड्.(शारीरिक शिक्षण) महाविद्यालयात सर्वप्रथम,

श्री आदित्य कुलकर्णी - एम.एड्.(शारीरिक शिक्षण) महाविद्यालयात सर्वप्रथम,

राज्य, राष्ट्रीय/खुल्या स्पर्धेत चमकलेल्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला.

- **एम.एड.(शा.शि.)**

पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यामध्ये **सराव अध्यापनास** शास्त्रीय व शैक्षणिक बैठक देण्याचे प्रयत्न करण्यांत आले. द्वितीयसत्रापासून वेळोवेळी कार्यशाळा व संशोधन कार्यासाठी कार्यक्रम घेतल्यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षण संशोधनाचे आकलन व प्रत्यक्ष संशोधन करणे सुकर झाले. या विद्यार्थ्यांना ख़ालील तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले.

श्री गणेश गावडे – व्हॉलीबॉल

श्रीमती पल्लवी कव्हाणे –योगा

श्री धर्मेंद्र लांबा –टेस्ट अॅन्ड मेजरमेंट प्रॅक्टिकल

श्री प्रतिक जाधव – बास्केट्बॉल

श्री अरविंद चव्हाण – अॅथलेटिक्स

- **एम. फिल्.(शा.शि.)**

शै. वर्ष 2014-16 साठी 13 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या वर्षावधीत ४ विद्यार्थ्यांनी एम. फिल्.(शा.शि.) पदवी प्राप्त केली.

## ➢ पीअेच.डी.

या वर्षावधीमध्ये 06 विद्यार्थ्यांना पीएच.डी जाहीर झाली.

## ➢ निवृत्ती व नियुक्ती

नियत वयोमानानुसार प्राचार्या डॉ.नयना निमकर दि.२९/११/२०१४ रोजी सेवानिवृत्त झाल्या. तेव्हापासून डॉ. माधुरी वाघचौरे यांचेकडे प्राचार्यपदाचा कार्यभार सोपविण्यांत आला आहे.

दि. ३०/१०/२०१४ रोजी कार्यालयीन कर्मचारी सौ. मेघन कसरेकर यांनी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिला.

संस्थेने ऑगस्ट २०१४ पासून श्री.राजीव तिकोने यांची लेखनिक –टंकलेखक म्हणून तर ग्रंथालयात सप्टेंबर २०१४ पासून सहाय्यक ग्रंथपाल पदावर कु. आश्लेषा सैंदाणे यांची तात्पुरती नियुक्ती केली आहे.

शासकीय नियमानुसार दि. ३० एप्रिल २०१५ रोजी महाविद्यालयाचे मुख्य लिपिक श्री जयंत तपस्वी सेवानिवृत्त होत आहेत.

## ➢ दु:खद निधन

या वर्षावधीमध्ये महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापिका श्रीमती लता दिवाण व निवृत्त ग्रंथपाल श्री आर.एम.खेडकर यांचे दु:खद निधन झाले.

## ➢ माजी विद्यार्थी मेळावा

शै. वर्ष १९९९ –२००० च्या बी.एड (शा.शि.) अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याचा स्नेहमेळावा दि.३ एप्रिल २०१५ रोजी संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीविषयी समाधान व्यक्त केले.

## ➢ आगाशे प्राईड पुरस्कार

भारत सरकारचा २०१४–१५ चा आदर्श शिक्षक पुरस्कार आमच्या माजी विद्यार्थिनी व मॉडर्न हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.शोभा निकम यांना मिळाला आहे. मॅडम गेली ३५ वर्षे शिक्षण, क्रीडा व शारीरिक शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांना क्रीडापुरस्कार मिळाले आहेत. शिक्षकीपेशात राहून केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल, आमच्या माजी विद्यार्थिनी मॉडर्न हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सौ.शोभा निकम यांचा आगाशे प्राईड पुरस्कार व मानपत्र देऊन सन्मान करण्यांत

महाराष्ट्रीय मंडळाचे सरचिटणीस, श्री धनंजय दामले, आमचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख नेहमी उंचावत राहिला आहे.

**(डॉ. माधुरी वाघचौरे)**
**प्रभारी प्राचार्य**

## Conference/ Seminar/ Worskhops Participation

| Sr. No. | Name | Title of the conf/Semi/W.S. | Participated as |
|---|---|---|---|
| 1 | Prin.Dr.N.D.Nimkar | International Symposium on Marathon Dt.5/12/2014 | Orgnizer |
| 2 | Dr. M.T. Waghchoure | National conf.on Trends,Issues & Future of PE & Sports (27-28 Feb.2015) | Orgnizer |
| 3 | Dr.S.E.Kangane | 1) State level Seminar on "Need & Importance of Phy.Edn.in different levels of school (College of Education, Chakan) (30-31 Oct.2014) | Resource person |
| | | 2) शारीरिक शिक्षण ,क्रीडा प्रशिक्षण शिबिर, परभणी (१७–२० नोव्हेंबर.२०१४) | Resource person |
| 5 | Dr.B.S.Pote | 1) National conf.on Trends,Issues & Future of PE & Sports (27-28 Feb.2015) | Paper on |
| | | | |
| 6 | Dr.S.S.Aher | | |
| 7 | Dr.U.L.Raje | National conf.on Trends,Issues & Future of PE & Sports (27-28 Feb.2015) | Paper on |
| 8 | Dr. S.A.Naik | | |
| 9 | Dr. S. S. Mahadik | | |
| 10 | Dr.M.N.Deshpande | National conf.on Trends,Issues & Future of PE & Sports (27-28 Feb.2015) | Coordinator |
| | | शारीरिक शिक्षण ,क्रीडा प्रशिक्षण शिबिर, परभणी (१७–२० नोव्हेंबर.२०१४) | Resource person |
| 11 | Dr.Y.H.Bodke & Mr.S.V.More | International Conf.on PE & Sp Sciences (6-7 Jan.2015) ISBN No.9788189463991 जे.ई.सी.आर.सी विद्यापीठ जयपुर राजस्थान | Paper presented on Use of Mobile Health& fitness Apps for fitness: A modern Trend". |
| 12 | Dr.A.D.Prabhu | National conf.on Trends,Issues & Future of PE & Sports (27-28 Feb.2015) | Paper on |

**Papers Published in an Intenrational Journal**

1) **Dr. Waghchoure & Anap U.D.**
   **Indian Strems Research Journal(Vol3 Issue-3 April 2013 ISSN No 2230-7850**
   **Title – योग प्रशिक्षण आणि पाण्यातील (जल) व्यायामाच भावनिक क्षमतेतील भावनेची खोल जाणीव होणे व भावनेसह कार्य करण्याची क्षमता या घटकावर होणा–या परिणामाचा अभ्यास**

2) **Dr. Waghchoure & Anap U.D.**
   **International Multi-Disciplinary Referred and Reviewed Research Journal (Vol-2 Issue-2 Apr.2013 ISSN-2250-0383 RNI-02988/13/01/2011-TC**
   **Effect of Yoga Training and Aquatic Training on Abuility to Function with Emotions (AFE)**

**Dr. S.E.Kangane**

1) International Journal of P.E & Sports Management & Health Edn(ISSN 2349-6703) (Copy Vol.1No.1: Dec.2014)

Published by St.Aloysius' College Adathala
Title : "Effect of Selected Yoga and Non-Yoga Practices on Cardiovascular Efficiency of Obese Students"

**Dr. Y.H. Bodke & S.V. More**

2) International Conf.on PE & Sp Sciences (6-7 Jan.2015)
ISBN No.9788189463991 Pulished by JECRC Univ. Jaipur
Title : Paper presented on Use of Mobile Health& fitness Apps for fitness: A modern Trend".

# महाराष्ट्रीय मंडळाचे चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालय

## Intercollegiate Sports 2014-15 Participation

| Sr.No | Course | Boys | Girls | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | **B.Ed** | 61 | 30 | 91 |
| 2 | **M.Ed 1** | 17 | 7 | 24 |
| 3 | **M.ED 2** | 13 | 6 | 19 |
| | | **91** | **43** | **134** |

**Zonal Sports Particpation 2014-15**

| Sr.No | Course | Boys | Girls | Total |
|---|---|---|---|---|
| 1 | **B.Ed** | 19 | 15 | 34 |
| 2 | **M.Ed 1** | 4 | 5 | 9 |
| 3 | **M.ED 2** | 6 | 5 | 11 |
| | | **29** | **25** | **54** |

## AIU And IU Sports Participation

## 2014-15

| | | **B.Ed** | | **M.Ed** | **I** | **M.Ed** | **II** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr.No | | **Boys** | **Girls** | **Boys** | **Girls** | **Boys** | **Girls** | **Total** |
| 1 | **Archery** | 2 | | | | **1** | | 3 |
| 2 | **Basketball** | 1 | | | | | | 1 |
| 3 | **Ball Badminton** | 1 | | | | | | 1 |
| 4 | **Base Ball** | | 1 | | | | | 1 |
| 5 | **Fencing** | | | | | 1 | | 1 |
| 6 | **Football** | 1 | 1 | | | | | 2 |
| 7 | **Hand Ball** | | | 1 | 1 | | | 2 |
| 8 | **Kho-Kho** | | 4 | | 1 | | | 5 |
| 9 | **Wt Lt** | | | | | | 1 | 1 |
| 10 | **Cricket** | | 1 | | | | | 1 |
| 11 | **Pw Lt** | | | | | | 1 | 1 |
| 12 | **Hockey** | 1 | | | | 2 | | 3 |
| 13 | **Mallakhamb** | 1 | 1 | | | | | 2 |
| | | 7 | 8 | 1 | 2 | 4 | 2 | 24 |

# Zonal Sports Participation 2014-15

| | | B.Ed | | M.Ed | I | M.Ed | II | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | | Boys | Girls | Boys | Girls | Boys | Girls | |
| 1 | Archery | 2 | | | | 1 | | 3 |
| 2 | Athletics | 2 | 3 | | 1 | 1 | | 7 |
| 3 | Ball Badminton | 1 | | | | | | 1 |
| 4 | Base Ball | 2 | 1 | | 1 | 1 | | 5 |
| 5 | Basket Ball | 1 | | | | | | 1 |
| 6 | Cross Country | | | 1 | 2 | | | 3 |
| 7 | Fencing | | | | | 1 | | 1 |
| 8 | Football | 4 | 2 | | | | | 6 |
| 9 | Hand Ball | | | 1 | | | 4 | 5 |
| 10 | Hockey | 1 | | | | 2 | | 3 |
| 11 | Pw Lt | | 1 | | | | | 1 |
| 12 | Kabbadi | 1 | | | | | | 1 |
| 13 | Kho-Kho | | 4 | 1 | | | | 5 |
| 14 | Cycling | 1 | 1 | | | | | 2 |
| 15 | Net Ball | 1 | | | | | | 1 |
| 16 | Shooting | | | | | | | 0 |
| 17 | Soft Ball | 1 | 1 | 1 | 2 | 1 | | 6 |
| 18 | Malkhamb | 1 | 1 | | | | | 2 |
| 19 | Volleyball | | 1 | | | 1 | | 2 |
| 20 | Wrestling | 1 | | | | | | 1 |
| 21 | Wt Lt | 1 | | | | | | 1 |
| 22 | Cricket | | 1 | | | | | 1 |
| | | 20 | 16 | 4 | 6 | 8 | 4 | 58 |

**Team Participation and Performance 2014-15**

| Sr. No | Event | Performance | |
|---|---|---|---|
| | | Men | Women |
| 1 | **Athletics** | 1st | 1st |
| 2 | **Base Ball** | 3rd | 1st |
| 3 | **Basket Ball** | Part | 1st |
| 4 | **Cross Country** | 1st | 1st |
| 5 | **Football** | 2nd | NP |
| 6 | **Hand Ball** | 2nd | NP |
| 7 | **Hockey** | 3rd | NP |
| 8 | **Kabbadi** | 3rd | NP |
| 9 | **Kho-Kho** | 3rd | 1st |
| 10 | **Net Ball** | Part | Part |
| 11 | **Shooting** | Part | Part |
| 12 | **Soft Ball** | Part | Part |
| 13 | **Volleyball** | Part | NP |

**Individual Participation and Performance 2014-15**

| Sr. No | Event | Performance | |
|---|---|---|---|
| | | Men | Women |
| 1 | **Archery** | 1st | 1st |
| 2 | **Fencing** | 2nd | NP |
| 3 | **Pw Lt** | 3rd | NP |
| 4 | **Wrestling** | 1st | NP |
| 5 | **Wt Lt** | 2nd | NP |
| 6 | **Cycling** | Part | Part |
| 7 | **Malkhamb** | 1st | 1st |
| 8 | **Swimming** | NP | 2nd |
| 9 | **Cayaking** | NP | Part |